**रे.के.नं. २३३/२०२२**
**नि.क्र. १६/क**

अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र. १** याची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | संतोष नंदकुमार गर्जे, |
| वय | - | ५० वर्षे |
| व्यवसाय | - | दुकान, |
| राहणार | - | नागाव, ता. उरण, जि. रायगड. |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता पी. बी. देशमाने यांच्याद्वारे**

१. मी आजरोजी न्यायालयात न्यायालयाचे समन्स प्राप्त झाल्याने पुरावा देणेकामी आलो आहे. घटना ही अंदाजे ४ वर्षापुर्वी घडली होती. मी सकाळी १०.०० वाजताचे सुमारास माझे दुकान उघडले होते. माझे बिअरचे शॉप आहे. तेव्हा मला माझे दुकानाचे शटर वर असलेले दिसले. तेव्हा मला माझे दुकानातील बाटल्या कमी असल्याचे आढळले. तसेच शटरचे लॉक तोडलेले दिसले. त्यामुळे मी त्याबाबत पोलीसांना माहिती दिली. त्यामुळे पोलीस लगेच तेथे आले व त्यांनी पंचनामा केला. मी फिर्याद दिली होती. आता मला ती फिर्याद दाखवली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे करीता फिर्यादला **निशाणी क्र. पी१ पीडब्ल्यु १** देण्यात येतो. आता मला प्रथम खबर दाखवली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे करीता प्रथम खबरला निशाणी क्र. पी२ पीडब्ल्यु १ देण्यात येतो. मी ज्या व्यक्तीने माझे दुकानात चोरी केली त्याला पाहिले नव्हते.

रे.के.नं. २३३/२०२२
नि.क्र. १६/क

आरोपी व त्यांचे वकिलांचा पुकारा केला असता गैरहजर. करीता फौजदार प्रक्रिया संहितेच्या कलम ३०९ अंतर्गत पुरावा बंद करण्यास सबळ कारण असल्याने आरोपीतर्फे उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

उरण, (एस.पी. वानखडे )

दिनांक – १८/०७/२०२६ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.१ उरण